सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १६८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# छत्रपती शिवाजी महाराज हे 'विश्ववंदनीय' तर टीपू सुलतान 'कलंक'

## इतिहासाचा खुन करणाऱ्या काँग्रेसचा काळजावर घाव! हर्षवर्धन सपकाळांनी माफी मागावी; भाजप कार्यकर्त्यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** काँग्रेस प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना टिपू सुलतानशी करून हा महाराष्ट्राच्या अस्मितेवर थेट घाला घातला आहे, हा इतिहासाचा अपमान आहे. त्याच्या या निषेधार्थ भाजपा जालना ग्रामीण व जालना महानगर जिल्हयाच्या वतीने काँग्रेसचे खासदार कल्याण काळे यांचे कार्यालया समोर आज दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी बोलतांना जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायणराव कुचे म्हणाले की, महाराष्ट्राच्या पवित्र मातीत बसून, स्वराज्याच्या अन्नावर पुष्ट होऊन एखादा मूर्ख नराधम नेता छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना टीपू सुलतानसारख्या क्रूर, धर्मांध आणि अत्याचारी आक्रमकाशी करण्याचे धाडस करतो, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. बिनडोक हर्षवर्धन सपकाळ यांनी हे विधान करून महाराष्ट्राच्या करोडो शिवभक्तांच्या काळजात घाव घातला आहे. केवळ एका विशिष्ट मतपेढीला खूश करण्यासाठी तुम्ही महाराजांचा अपमान करणार असाल, तर हा महाराष्ट्र तुम्हाला कधीही माफ करणार नाही. तुमच्या राजकारणासाठी टीपू सुलतान महान असेल, पण आमच्यासाठी तो केवळ एक 'धर्मांध आक्रमक' होता आणि राहील. ज्या शिवरायांनी औरंगजेबासारख्या प्रवृत्तींना गाडून स्वराज्याचा भगवा फडकवला त्याच वारशात तुम्ही अशा आक्रमकणकारांचे उदात्तीकरण करता हे लज्जास्पद आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळच हे वक्तव्य हे अज्ञानाचा कळस नाही, तर तो महाराष्ट्राच्या आराध्य दैवताचा जाणीवपूर्वक केलेला अपमान आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी आपले विधान तात्काळ मागे घेऊन रायगडाच्या दिशेने तोंड करून महाराष्ट्राची माफी मागावी. अन्यथा शिवरायांच्या दैवताचा अपमान करणाऱ्यां हर्षवर्धन सपकाळला जनता त्यांची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही असे ते म्हणाले.

यावेळी जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायणराव कुचे, माजी जिल्हाध्यक्ष श्री.रामेश्वर भांदरगे, बद्रीनाथ पठाडे, अनिलराव कोलते, सुनिल पवार, हरीचंद्र शिंदे, विश्वजीत खरात, अर्जुन गेही, सुनिल खरे,धनराज काबलिये, देविदास देशमुख, राजेश जोशी, गोविंद ढेंबरे, गणेश ठाले, भाऊसाहेब जाधव,वसंतराव जगताप,बाबुराव पवार, सत्यनारायण गिल्डा,सोपान पेंढारकर, पदृमाकर जऱ्हाड, भगवान मात्रे, प्रदीप पवार,गजानन नागवे,सौरभ कुलकर्णी,संजय आटोळे, संजय डोंगरे,रणविर देशमुख गणेश कोल्हे, शंकर सपकाळ,मनोज थारेवाल, तुलजेश चौधरी, विकास कदम, संतोष वरकड, अनिल संचेती, रामलाल जाधव,निलेश गवळी,नागेश अंभोरे,सुधाकर शिंदे, संदीप पवार,मधुकर मुकूटराव, दिपक मुंडलिक,बाबासाहेब कराळे, बाळासाहेब काळे, राधाकिसन शिंदे, रवि बोचरे, गणेश बावणे, सुरेश लहाणे यांच्यासह आदींची उपस्थित होती.



## जालन्यातील भाविक खाटूशाम येथे होणार रवाना

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यातील भाविक २१ फेब्रुवारी होणार आहे. यावेळी बहुभाषिक ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुरेश मुळे, सिल्लोड येथील निसर्ग कवी धनजय गव्हाले, सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे, संजय कीर्तने यासह ३० ते ४० जालन्यातील भाविक खाटूशाम येथे रवाना होणार आहे. खाटू श्याम जी मंदिर हे राजस्थानच्या सीकर जिल्ह्यात स्थित भगवान श्रीकृष्णाचे (बर्बरीक) एक अत्यंत प्रसिद्ध आणि पवित्र तीर्थक्षेत्र आहे, ज्यांना 'कलियुगाचे देव' मानले जाते.

युवा आदर्श

### व्यक्त हो ...

**दोन वाक्ये स्टेटसवर**
**ठळकपणे ठेव फक्त**
**मोजक्या शब्दांमध्ये**
**सहजते व्हालं व्यक्त**
**परिणाम साधे योग्य**
**माध्यम आहे सशक्त**
**धाडस दाखवे सगळे**
**मुख दुर्बळ जे अशक्त**
**इमोजीतून समजेल**
**का सांगता अतिरिक्त**
**सिहांसनावर विराजे**
**स्थान सन्माने रिक्त**
**नव्या तंत्र ज्ञानावरती**
**जनता अति आरक्त**
**भाषणे नको लांबडी**
**अल्प अक्षरेचं संयुक्त**
**स्टेटस् कित्येक अर्थ**
**नवी पिढी रे अनुरक्त**
**अर्थाचा होऊ दे अनर्थ**
**होई नामानिराळे मुक्त**
**लहानग्या मेसेजमधून**
**उलटूनि टाकाल तख्त**
**विना सायास सहजते**
**राजा बनाल अभिषिक्त**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# व्यापाऱ्याला 'सुपारी' देऊन लुटणारी टोळी जेरबंद

## चंदनझिरा पोलिसांची मोठी कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** मोसंबीची बाग दाखवण्याच्या बहाण्याने एका व्यापाऱ्याला निर्जन स्थळी बोलावून, त्याला व त्याच्या मुलाला बेदम मारहाण करून लुटणाऱ्या सहा आरोपींच्या टोळीला चंदनझिरा पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींकडून २ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या कारवाईमुळे जिल्ह्यातील एका मोठ्या गुन्हेगारी टोळीचा पर्दाफाश झाला आहे.

नेमकी घटना काय?

जालना शहराजवळील मंडवा शिवारात एका व्यापाऱ्याला मोसंबीची बाग दाखवण्याच्या बहाण्याने बोलावण्यात आले होते. तिथे व्यापाऱ्याला आणि त्याच्या मुलाला गंभीर मारहाण करून त्यांच्याकडील रोख रक्कम, सोन्याची अंगठी आणि मोबाईल असा ऐवज जबरीने लुटण्यात आला होता. याप्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

असा लागला छडा

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी तपासासाठी विशेष पथक नियुक्त केले होते. तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी गणेश संतोष परळकर (वय २१, रा. गांधीचमन, जालना) याला ताब्यात घेतले. सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र पोलिसांनी खाक्या दाखवताच त्याने गुन्ह्याची कबुली दिली. छत्रपती संभाजीनगर येथील एका इसमाकडून 'सुपारी' घेऊन हा गुन्हा केल्याचे त्याने मान्य केले.

अटक करण्यात आलेले आरोपी: गणेश संतोष परळकर (वय २१, रा. जालना), महेश उर्फ सोनू राजू गोशीक (वय २४, रा. लक्ष्मीनारायणपुरा, जालना), गणेश बाबूराव मोहिते (वय ४२, रा. जालना), गणेश भावराव पाखरे (वय ४३, रा. दरेगाव, ता. जि. छ. संभाजीनगर), ईलीयास नजीरोद्दीन बागवान (रा. लाडसावंगी, ता. जि. छ. संभाजीनगर), कृष्णा दीपक पैंजणे (रा. जालना) या गुन्ह्यातील अन्य एक आरोपी जितु मेहरा (रा. मस्तकड) हा सध्या फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

जुन्या वादातून दिली होती सुपारी

पोलीस तपासात असे निष्पन्न झाले की, आरोपी ईलीयास बागवान आणि जखमी व्यापारी अशफाक बागवान यांच्यात जुना वाद होता. याच वादातून ईलीयासने गणेश पाखरेमार्फत गणेश परळकरच्या टोळीला व्यापाऱ्याला मारहाण करण्याची सुपारी दिली होती.

इतर गुन्ह्यांचीही कबुली

या टोळीने केवळ हीच लूट केली नाही, तर अंबड रोडवरील अशोक हॉटेलसमोर एका दुचाकीस्वाराला अडवून खंजीरने वार करत साडेतीन लाख रुपये



लुटल्याची कबुलीही दिली आहे. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, पोलिसांनी आरोपी कृष्णा पैंजणे याला ताब्यात घेतले आहे.

**जप्त मुद्देमाल**

पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेले: मोबाईल फोन, दोन खंजीर, मोटारसायकल असा एकूण २ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे, मनसुब वेताळ , प्रशांत देशमुख , कृष्णा तंगे, अभिजीत वायकोस, रवींद्र देशमुख, जोहसिंग कलानी, वाघुंडे सागर बावस्कर दत्ता वाघुंडे त्यांच्या पथकाने फत्ते केली.



**आज महाशिवरात्री निमित्त शहरातील पंचमुखी महादेव मंदिरात भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने दर्शन घेतले यावेळी माजी मंत्री आमदार अर्जुन खोतकर व सौ सीमाताई खोतकर यांच्या हस्ते आरती करण्यात आली (छायाचित्र अनिल व्यवहारे)**




# खणेपुरीतील महानुभाव देवस्थानात मानवतेच्या संस्कारांची रूजवण!

## आ.अर्जुनराव खोतकर यांचे प्रतिपादन, भाविकांची मोठी उपस्थिती



**जालना । प्रतिनिधी -** धर्मसत्ता आणि राजसत्ता यांना एका सूत्रात बांधण्याचा प्रयत्न १०८ कोटी नामस्मरण महंत श्री प्रज्ञासागर बाबा महानुभाव यांनी केला असून खणेपुरी येथील श्रीकृष्ण नाथ महानुभाव देवस्थानाच्या माध्यमातून मानवतेची शिकवण, संस्कार रुजविण्याचे कार्य अखंडपणे सुरू आहे.असे प्रतिपादन आ.अर्जुनराव खोतकर यांनी केले.तथापि अशी संस्थाने बळकट झाली पाहिजे, यासाठी सामुहिक प्रयत्न करावे असे आवाहनही त्यांनी केले. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी विचार प्रबोधिनी सेवाभावी संस्थेच्या वतीने श्री श्री सुत्रपाठ ग्रंथ महाराज पालखी सोहळ्यानिमित्त आयोजित धर्मसभेचे उद्घाटन आ.अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते झाले. यावेळी महंत श्री प्रज्ञासागर बाबा महानुभाव, उपाध्य प.पू.लोणारकर बाबा, महंत प.पू .केशराज बाबा कपाटे,प.पू .म.विष्णू बाबा शेवलीकर,प.पू .म.येलेराज बाबा,प.पू .म.संतोष मुनी शास्त्री,प.पू .म.आचार्य श्री भोजने बाबा, संस्थानचे सचिव प.पू . उद्धवराज प्रज्ञासागर बाबा महानुभाव, महंत भानुव्यास बाबा,बबन दराडे,बाईसाबाई प्रज्ञासागर, पंडितराव भुतेकर, संतोष मोहिते,ड.परेश पाटील, भास्कर गाढवे, राजेंद्र देशमुख,यांची प्रमुख उपस्थिती होती. आ.खोतकर या प्रसंगी म्हणाले, कुठलाही धर्म,पंथ केवळ मानवता शिकवतो, चक्रधर स्वामींचा हाच विचार घेऊन प्रज्ञासागर बाबा यांनी खणेपुरीत सुरेख, रेखीव मंदिराची उभारणी केली आहे.या संस्थेसाठी आपले नेहमीच सहकार्य राहील अशी ग्वाही आ.खोतकर यांनी दिली. उपस्थित धर्माचार्य,महंतांनी मार्गदर्शन केले.धर्मसभेस हजारो भाविकांची उपस्थिती होती. सुत्रसंचालन उद्धवराज प्रज्ञासागर बाबा महानुभाव यांनी केले.तंदुलवाडी येथील नकुलराव भिसे व भिसे परिवाराने मानाचे पालखी पूजन करून जबाबदारी सांभाळली.

## संपादकीय पान

## निष्कलंक चारित्र्याचे, अजातशत्रू व्यक्तिमत्व

राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले निष्कलंक चारित्र्याचे माजी उपमख्यमंत्री रावसाहेब राजाराम पाटील उर्फ आर आर पाटील यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १६ फेब्रुवारी २०१५ रोजी आर आर पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले होते. आर आर पाटील यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. आर आर पाटील म्हणजे राजकारणातील आम आदमी. शेतकरी असोत की सर्वसामान्य नागरिक, गरीब असोत की वंचित प्रत्येकाला आर आर पाटील आपले वाटत होते. राजकारणात उपमुख्यमंत्री पदासारख्या मोठ्या पदापर्यंत पोहचूनही कायम जमिनीवर राहून जनतेशी नाळ टिकवलेले आर आर पाटील सर्वसामान्यांचे नेते होते म्हणूनच त्यांना सर्वसामान्य नागरिक त्यांना प्रेमाने आबा म्हणत. १६ ऑगस्ट १९५७ रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील अंजनी गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात आबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आबांनी कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण घेतले. बी ए झाल्यानंतर त्यांनी एलएलएलबी चे ही शिक्षण घेतले. कॉलेज जीवनातच त्यांनी शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडायला सुरुवात केली. त्यांच्यातील नेतृत्व गुण वसंत दादा पाटलांनी हेरले आणि त्यांना राजकारणात आणले. कोणतीही राजकीय पार्शवभूमी नसताना समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द, मनाला भिडणारी भाषण शैली आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच राजकारणात बस्तान बसवले. १९७९ साली पहिल्यांदा जिल्हा परिषद सदस्य म्हणून आबा निवडून आले. १९७९ ते १९९० असे एकवीस वर्ष आबा जिल्हा परिषद सदस्य होते. १९९० साली आबांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली आणि प्रचंड मतांनी जिंकली. त्यानंतर २०१४ पर्यंतच्या विधानसभेच्या सर्व निवडणुका आबांनी जिंकल्या. १९९५ साली आबा दुसऱ्यांदा आमदार झाल्यावर राज्यात युतीचे सरकार आले. विरोधी पक्षात असलेल्या आबांनी राजकीय आयुधांचा वापर करून अनेकदा सत्तधाऱ्यांना कोंडीत पकडले. विरोधी पक्षात असूनही आबांनी विधानसभा गाजवून सोडली. १९९९ साली राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर ते राष्ट्रवादीत आले. शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू साथीदार अशी त्यांची ओळख बनली. त्यांनीही राष्ट्रवादी घराघरात पोहचवण्यासाठी जीवाचे रान केले. ते काही काळ राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्याचे अध्यक्ष होते. राज्य मंत्रिमंडळात त्यांना अनेक महत्वाची पदे मिळाली. आर आर पाटील ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. पुढे राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली. गृहमंत्री असताना त्यांनी राज्यातील डान्स बार बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. डान्स बार बंद करण्याचा त्यांच्या निर्णयाला कडाडून विरोध झाला पण ते आपल्या निर्णयावर ठाम राहिले. गृहमंत्री असतानाच त्यांनी महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान राबवले. गृहमंत्री असताना त्यांनी खाजगी सावकारी विरूध्दही दंड थोपटले होते तसेच त्यांनी गुटखा बंदी करण्याचा देखील निर्णय घेतला होता. त्यांच्या याच धडाकेबाज निर्णयांनी त्यांनी सर्वसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते. गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी मोठी पदे भूषवूनही आबांनी तळागळातील कार्यकर्त्यांशी असलेला संवाद तुटू दिला नाही. सत्ता येते आणि जाते जोडलेले माणसे टिकवली पाहिजेत हे आबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. उच्च पदावर पोहचूनही आबांनी आपला साधेपणा कायम ठेवला. इतक्या मोठ्या पदावर असतानाही आबांनी आपल्या पाल्यांना महागड्या इंग्रजी शाळेत न घालता जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत घातले होते. आबांसारखे तळागळातून आलेले स्वच्छ चारित्र्याचे निष्कलंक, अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकारणात विरळच. सध्याच्या गढूळ राजकीय वातावरणात तर आबांसारख्या निष्कलंक चारित्र्याच्या नेत्याची आवर्जून आठवून येते. राजकारणात त्यांनी जो आदर्श घालून दिला आहे त्याचे अनुकरण आजच्या राजकीय नेत्यांनी केले तरच राजकीय नेत्यांवरील जनतेचा उडालेला विश्वास पुन्हा प्राप्त होईल. आबांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

# पशुधनाला केंद्रस्थानी ठेवून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणार -मुख्यमंत्री





**परळी वैजनाथ । प्रतिनिधी -** आमची माय आणि आमची माती हेच आमचे खरे प्रेम आहे. ज्याप्रमाणे शिवशंभूंच्या दर्शनापूर्वी नंदीला वंदन करण्याची आपली संस्कृती आहे, त्याच धर्तीवर पशुधनाला केंद्रस्थानी ठेवून आम्ही ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकट करत आहोत. तंत्रज्ञानाच्या जोडणीतून हे क्षेत्र महाराष्ट्राला जागतिक स्तरावर दुग्ध उत्पादनात अग्रेसर करेल, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

परळीतील अंबेजोगाई रस्ता लगत असलेल्या ओपळे मैदानावर पशुसंवर्धन विभाग आयोजित तीन दिवसीय महा पशुधन एक्स्पोच्या पाहणीनंतर मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. याप्रसंगी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे, आमदार रत्नाकर गुट्टे, पशुसंवर्धन विभागाचे सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन, आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठम कुलगुरू डॉ. नितीन पाटील, पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे, खासगी सचिव मंदार वैद्य, अपर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे, उपविभागीय अधिकारी अरविंद लाठकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, पशुसंवर्धन विभागाचे सह आयुक्त, बहुसंख्येने पशुपालक उपस्थित होते.

शेतीला 'क्लायमेट रिस्क' मधून वाचवणार

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, हे प्रदर्शन केवळ एक सोहळा नसून कोरडवाहू शेतीतील हवामान जोखीम (उश्रळारींश ठळीज्ञ) कमी करण्यासाठी उचललेले एक धोरणात्मक पाऊल आहे. पिकांचे नुकसान झाले तर पशुधन हेच शेतकऱ्यासाठी आधार म्हणून काम करते. त्यामुळेच आम्ही गाईला केवळ धार्मिक महत्त्व न देता तिचे आर्थिक योगदान लक्षात घेऊन 'राज्यमाता' दर्जा दिला आहे.

तंत्रज्ञानाची कास: ख आणि एम्ब्रियो ट्रान्सप्लांट

दुग्ध व्यवसायातील तफावत मांडताना मुख्यमंत्री म्हणाले, पंजाबमध्ये गाय १०-१५ लिटर दूध देते, तर आपल्याकडे २.५ लिटर ही तफावत भरून काढण्यासाठीचे प्रयत्न सुरु आहेत. पशुधन संवर्धन, आरोग्य व अचूक निरीक्षण आणि उत्पादकता वाढविण्यासाठी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स (ख) मिशन' चा वापर करण्यात येईल. एम्ब्रियो ट्रान्सप्लांट आणि सेक्स-सॉर्टेड सीमेन तंत्रज्ञानाद्वारे उच्च दर्जाच्या कालवडींची पैदास वाढवून दुग्धोत्पादन वाढवले जाईल. यासाठी विदर्भ- मराठवाड्यात 'मदर्स डेअरी' सोबत करार देखील करण्यात आला आहे.

अफवांवर विश्वास नको

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृषी क्षेत्राला जागतिक स्पर्धेपासून सुरक्षित ठेवले आहे. भारत- अमेरिका करारात सोयाबीन किंवा कापूस आयातीचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे बाहेरील माल येऊन भाव पडतील, या अफवांवर शेतकऱ्यांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. याउलट भारतीय शेतकऱ्यांना अमेरिकेची मोठी बाजारपेठ आता खुली झाली असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

गावातला तरुण होईल 'पशुधन उद्योजक': पंकजा मुंडे

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, केवळ नोकरीच्या मागे न लागता गावातील तरुणांनी मालक बनावे, यासाठी आम्ही लवकरच 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना' आणत आहोत. महिलांना लखपती दीदी बनवण्यासाठी शासनाकडून शून्य टक्के व्याजावर कर्ज उपलब्ध करून देत आहे. तसेच पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा देणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. हा दर्जा दिल्याबद्दल मुख्यमंत्री महोदयांचे मंत्री मुंडे यांनी आभार मानले.

माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनीही परळीच्या विकासासाठी मुख्यमंत्री महोदय यांच्या समोर मागण्या मांडल्या. तसेच बीड व परळीचे विकासासाठी कायम निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री यांचे आभार मानले.

विजेत्यांचा गौरव

अहिल्यादेवी होळकर शेळी-मेंढी पालन योजनेतील विजेत्यांना आणि गोपाळ रत्न पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांना यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते पशुसंवर्धन विभागाच्या 'महापशुधन वार्ता' या मासिकाच्या १०व्या अंकाचे प्रकाशन व विभागाच्या 'दिनदर्शिका २०२६'चे अनावरण केले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी 'महापशुधन एक्स्पो २०२६'मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत पात्र महिला बचत गटांना प्रातिनिधिक स्वरूपात कर्ज वितरण केले. जिरेवाडी, ता. परळी येथील तुळजाई महिला स्वयंसहायता समूहास रु १५,००,००० इतक्या कर्जाचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद)च्या स्मार्ट प्रकल्पांतर्गत बर्दापूर येथील 'उमेद सखी - महिला शेतकरी उत्पादक कंपनी'ला शासन अनुदानाच्या □१२,२७,५०० या प्रथम हप्त्याचे वितरण करण्यात आले.

सामंजस्य कराराचे प्रतिकात्मक हस्तांतरण

विदर्भ मराठवाडा दुग्धोत्पादन प्रकल्प आणि पशुधन विकास महामंडळ नागपूर यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराचे प्रतिकात्मक हस्तांतरण यावेळी करण्यात आले. पशुधन विकास मंडळ नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी शितल मुकणे आणि मुख्य शास्त्रज्ञ महात्मा फुले कृषी विद्यापीठ सोमनाथ माने त्यासोबतच डॉ. दिनकर बोर्डे उपायुक्त पशुसंवर्धन जिल्हा परिषद सातारा व विदर्भ मराठवाडा उत्पादन प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय गोराडे यांना यावेळी मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते कराराच्या प्रति हस्तांतरित करण्यात आल्या.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली, स्मृती दालनाचे उदघाटन

मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रदर्शनामध्ये असलेल्या विविध पशुधनाची पाहणी केली. पाहणीत त्यांनी पशु पालकांचे कौतुक केले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार स्मृती दालनाचे उदघाटनही त्यांनी केले. मुख्य कार्यक्रम ठिकाणी सुरुवातीला राष्ट्रगीत, राज्यगीत झाल्यानंतर दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. परळी नगर परिषदेच्या स्व. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाचे दूरदृष्य प्रणालीद्वारे लोकार्पण करण्यात आले. केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागामार्फत देण्यात येणाऱ्या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय गोपाल रत्न - २०२५ पुरस्कार घोषणा करण्यात आली असून राज्यातील दोन पशुपालकांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रगतीशील पशुपालक श्रीमती श्रद्धा ढवण यांची निवड झाली आहे. या कार्यक्रमात मुख्यमंत्री महोदय यांच्या हस्ते श्रीमती ढवण सत्कार करण्यात आला. तसेच लाल कंधारी व देवणी गट पशु पालकांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सायली संजीव यांनी केले. आभार सचिव डॉ. एन. रामास्वामी यांनी मानले. या सोहळ्याला परळीतील नागरिक आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी अलोट गर्दी केली होती.

मुख्यमंत्री यांच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे

उदगीर प्रकल्प: उदगीरचे दूध भुकटी केंद्र १०० कोटी खर्चून पुन्हा सुरू करणार.,

नैसर्गिक शेती: रासायनिक खतांमुळे बिघडलेला जमिनीचा पोत सुधारण्यासाठी गोमूत्र व शेणापासून तयार होणाऱ्या 'जीवामृता'ला प्रोत्साहन.

आरोग्य सेवा: राज्यातील २८४१ पशु दवाखान्यांचे आधुनिकीकरण आणि फिरत्या पशु म्ब्युलन्स सेवेचे जाळे.

विकास दर: पशुसंवर्धन क्षेत्राचा विकास दर सध्याच्या ४-८% वरून २५% पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट.

राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत महाराष्ट्रातील ३६६ प्रकल्पांना मंजुरी

## नोंदणी व मुद्रांक विभाग शिपाई भरतीची निवड यादी जाहीर

**जालना । प्रतिनिधी -** राज्य नोंदणी व मुद्रांक विभागातील शिपाई 'गट-ड' संवर्गातील २८४ पदांच्या भरती प्रक्रियेने अंतिम टप्पा गाठला आहे. आय.बी.पी.एस. मार्फत जुलै २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल आणि कागदपत्रे पडताळणीनंतर विभागाच्या संकेतस्थळावर अंतिम निवड व प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. असे सह.जिल्हा निबंधक वर्ग-१ जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे. शिपाई पदभरतीमध्ये सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी दि.१० फेब्रुवारी २०२६ रोजी www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासोबतच अपात्र, निवडीसाठी नकार दिलेले आणि पडताळणीला अनुपस्थित राहिलेल्या उमेदवारांची स्वतंत्र यादीही जाहीर झाली आहे. निवड झालेल्या उमेदवारांना आता नियुक्तीच्या अनुषंगाने समुपदेशनासाठी बोलावले जाणार आहे. याचे स्थळ आणि दिनांक लवकरच संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल. तरी उमेदवारांनी वेळोवेळी अधिकृत संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन नोंदणी व मुद्रांक विभागाने केले आहे.

## असंघटित कामगारांसाठी जिल्हास्तरावर आंदोलन उभारणार - ॲड. भास्कर मगरे

जिल्हाभरात तालुकास्तरीय चर्चासत्र व मेळाव्याचे आयोजन; बांधकामगारांसाठी जनजागृती करणार

**भोकरदन । प्रतिनिधी -** शिवसेना दलित आघाडीच्या वतीने जिल्ह्यात आणि मराठवाड्यात दलित,आदिवासी भूमिहिनांचे फार मोठे संघटन निर्माण करून दलित आदिवासी भूमिहीनांसाठी रस्त्यावरचा संघर्ष आणि आता असंघटित कामगारांसाठी जिल्ह्यात मोठे संघटन निर्माण करणार असल्याचे शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे यांनी सांगितले. भोकरदन येथे शिवसेना दलित आघाडीच्या वतीने भोकरदन तालुकास्तरीय रोजगार विषयक चर्चासत्र शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शिवसेना दलित आघाडी जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे प्रमुख मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन करताना म्हणाले. पुढे ते म्हणाले की, असंघटित कामगारांचे तालुकास्तरावर चर्चासत्र, शिबिरे आणि मेळावे आयोजित करून असंघटित कामगारांमध्ये जनजागृती निमर्णि करणार आहे. महाराष्ट्र शासनाचे बांधकाम कामगारांच्या सर्वांगीण कल्याणाच्या दिशेने कामगार विभाग कल्याणकारी पावले उचलत आहे. मात्र असंघटित कामगारांमध्ये संघटन नसल्यामुळे जनजागृती होत नाही म्हणून शासनाच्या योजनेचा लाभ खर्या लाभार्थ्यांना मिळत नाही. बांधकाम व्यावसायिकांमध्ये कामगारांना हेल्मेट,हॅन्ड ग्लोज, सुरक्षा बूट, सुरक्षा बेल्ट,सुरक्षा जॅकेट इत्यादी वस्तूंचा आग्रह धरावा, असेही मगरे यांनी सांगितले. याबरोबरच महिला बांधकाम कामगारास नैसर्गिक प्रसुतीसाठी अर्थसहाय दिल्या



जाते. लाभार्थी कामगारांच्या पाल्यांना शालेय स्कॉलरशिप दिल्या जाते. लाभार्थी कामगारांच्या शैक्षणिक अनेक प्रकारच्या सोयी सुविधा तरतूद आहे तसेच कामगारास अपंगत्व आल्यास विम्याची रक्कम दिल्या जाते. नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पाल्यांना इतरही सोयी सुविधा दिल्या जातात. तसेच लाभार्थी कामगाराच्या एका मुलीच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन केल्यास एक लाख रुपये मुदत ठेवीसाठी देतात, अशा अनेक योजनांची तरतूद महाराष्ट्र शासनाने संघटित बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी केलेले आहे. या सर्व सुविधा मिळवून देण्यासाठी शिवसेना दलित आघाडीच्या वतीने यापुढे जालना जिल्ह्यात तालुकास्तरीय चर्चासत्र व मेळाव्याचे आयोजन करून या सर्व सुविधा सोयी असंघटित कामगारांपर्यंत पोहोचविण्याचे काम या कार्यक्रमाच्या माध्यमातून होणार असल्याचे ॲड. भास्करराव मगरे यांनी सांगितले. यावेळी तालुक्यातील मोठ्या संख्येने भुमिहिन, कास्तकर, दलित आदिवासी, बांधकामगारांची उपस्थिती होती.

# नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी महापौर वंदनाताई मगरे उतरल्या मैदानात





**जालना । प्रतिनिधी -** शहरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी महापौर वंदना मगरे मैदानात उतरल्याच्या पाहायला मिळाल्या सकाळी पाच वाजल्यापासून वंदना मगरे जालना शहरात चंदनझिरा टाऊन हॉल गांधी चमन शिवनेरी नगर मस्तगड आदी भागांमध्ये नागरिकांच्या समस्या जाणून घेतले आहे.

या भागातील स्वच्छता निरीक्षक यांच्याकडून कर्मचाऱ्यांची हजरी घेऊन गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्यावर पगार कपात करण्यात आला आहे लगेच दुसऱ्या दिवशी वंदना मगरे यांनी स्वच्छता निरीक्षकांची बैठक घेऊन स्वच्छता निरीक्षकांना सप्तसूचना दिले आहे शहरात स्वच्छतावर भर द्या शहरात कचरा दिसता कामा नये स्वच्छतेसाठी नागरिकांच्या तक्रारी महानगरपालिकडे येऊ नये यासाठी आपण काम करावे असा सप्त सूचना स्वच्छता निरीक्षकांना देण्यात आले आहे महापौर वंदना मगरे यांचे नागरिकांना रोज पाणी आणि स्वच्छता वर भर देणार आहे यावेळी सामाजिक कार्यकर्ते रंजीत मगरे प्रशांत खरात स्वच्छता निरीक्षकांची उपस्थिती होती

**शहरात स्वच्छता आणि पाणी पुरठावर जास्त भर राहणार महापौर वंदना मगरे**

ज्यांना शहरात स्वच्छता आणि पाणी पुरठावर देनार असून शहरात वाढलेल्या अतिकानावर कारवाई करण्यात येणार आहे यामुळे नागरिकांच्या तक्रारी महानगरपालिकडे येऊ नये यासाठी आपण काम करणार असल्याची प्रतिक्रिया महापौर वंदना मगरे यांनी दिली आहे.

# पुण्यातील यशदा येथे जालना महापौर व नगरसेवकांचा सत्कार









**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेचा कारभार अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक पद्धतीने कसा चालवावा तसेच नागरिकांना सुविधा देताना कोणती भूमिका घ्यावी, या विषयावर नवनिर्वाचित नगरसेवकांसाठी पुणे येथील यशदा येथे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शनिवार व रविवार असे दोन दिवस हे प्रशिक्षण पार पडले.

या प्रशिक्षणात जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, नगरसेवक भास्कर दानवे, नगरसेविका संगीता गोरंट्याल, सुशीला दानवे, नगरसेवक अक्षय गोरंट्याल, आदींसह इतर नगरसेवक उपस्थित होते.

महापौर वंदना मगरे आणि उपमहापौर राजेश राऊत यांच्या निवडीनंतर जालन्याच्या जिल्हाधिकारी तथा म हानगरपालिका आयुक्त अशिमा मित्तल यांनी सर्व नगरसेवकांना महानगरपालिकेचा कारभार, नियोजन, विकासकामे आणि नागरिकाभिमुख निर्णय प्रक्रिया याविषयी मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने या प्रशिक्षणास उपस्थित राहण्याचे निर्देश दिले होते.

जालन्यातील एकूण ६५ नगरसेवक या प्रशिक्षणासाठी उपस्थित होते. या प्रसंगी महापौर वंदना मगरे व उपमहापौर राजेश राऊत यांचा सत्कारही करण्यात आला.



### मुक्त विद्यापीठ विद्यार्थ्यांची ब्लॉकचेन क्युआरकोड अंकित पदवी प्रमाणपत्राची डिजिटल प्रत उपलब्ध

## विद्यार्थ्यांना डिजिटल पोर्टलवर स्वतःची माहिती अद्ययावत, अचूक करण्याचे आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सूचना, महत्वाचे संदेश व पुढील परीक्षेसंदर्भातील आवश्यक ती माहिती विद्यार्थ्यांना त्या-त्या वेळी ईमेल व मोबाईलवर प्राप्त होण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या डिजिटल पोर्टलवर (हीींिः//ूर्ली.वळसळींरश्रींपळींशीींळीूं.रल) लॉगीन करून स्वतःच्या प्रोफाईल मधील वैयक्तिक माहिती तपासून अद्ययावत करावी. त्यात प्रामुख्याने स्वतःचा ईमेल आयडी व मोबाइल क्रमांकाची नोंद अचूक असणे अत्यावश्यक आहे, असे आवाहन मुक्त विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे व मा. प्र-कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या म ार्गदर्शनाखाली परीक्षा विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विद्यापीठाच्या उत्तीर्ण झालेल्या १ लाख २३ हजार ९८४ विद्यार्थ्यांचे ब्लॉकचेन क्युआरकोड अंकित पदवी प्रम ाणपत्र तयार करण्यात आले. त्यापैकी १ लाख ०३ हजार ६४० विद्यार्थ्यांना ईमेलद्वारे पीडीएफ स्वरूपातील प्रमाणपत्र यशस्वीरित्या पाठविण्यात आले. परंतु २० हजार ३४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेच्या वेळी ईमेल चुकीचे नोंदविल्याम ुळे त्यांचे पदवी प्रमाणपत्र पाठविले गेलेले नाही. मात्र सर्वच पदवी प्रमाणपत्रे हे ई-सुविधा मोबाईल ॲपमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कागदपत्रांचे डीजीटायजेशन व संरक्षण करण्याच्या दृष्टीने उचललेले हे प्रशासकीय व प्रशंसनीय पाऊल आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित क्यूआरकोड असलेल्या या प्रमाणपत्राची सुरक्षितता पूर्णपणे सुनिश्चित करण्यात आली आहे. कोणत्याही प्रमाणपत्रावरील मजकुरात बदल होऊ शकणार नाही. विद्यार्थ्यांकडे डिजिटल प्रत कायम स्वरूपी उपलब्ध राहणार असल्यामुळे मुलाखतीसाठी मूळ प्रत बाळगण्याची गरज राहणार नाही. ही प्रक्रिया पूर्णपणे कागदविरहीत असून नियोक्ते व विविध संस्थांना संबंधित पदवी प्रमाणपत्र काही सेकंदांत ऑनलाइन तपासता येणार आहे. त्यामुळे पडताळणी मानवी हस्तक्षेपाविना अधिक जलद व सुलभ पद्धतीने पार पडणार आहे. विद्यापीठातर्फे गेल्या वर्षीच्या दीक्षांत समारंभापासून विद्यार्थ्यांना पदवी प्रमापत्रावर ब्लॉकचेन क्युआरकोड अंकित करून त्याचे वितरण करण्यात येत आहे. ई-सुविधा मोबाईल ॲपम ध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या पदवी प्रमाणपत्राचा उपयोग पुढील शैक्षणिक कामकाजासाठी विद्यार्थ्यांनी करावा असे आवाहन परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांनी केले आहे.

### स्वप्नातील घरासाठी छ. संभाजीनगरच्या नागरिकांची इगतपुरीला पसंती

## 'समृद्धी'मुळे घरांच्या स्वप्नांना नवी गती मिळणार

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** छत्रपती संभाजीनगर येथील नागरिकांसाठी नाशिक जिल्ह्यातील निसर्गरम्य इगतपुरी शहर आता केवळ पर्यटनाचे केंद्र राहिले नसून, ते वास्तव्यासाठीही एक उत्तम पर्याय म्हणून समोर येत आहे. विशेषतः छत्रपती संभाजीनगरमधील नागरिक आता इगतपुरीमध्ये हक्काचे घर घेण्यास मोठी पसंती देत आहेत. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गामुळे या दोन्ही शहरांमधील अंतर अवघ्या काही तासांवर आल्याने, इगतपुरीच्या रिअल इस्टेट क्षेत्रात मोठी गुंतवणूक होत आहे.

समृद्धी महामार्गाच्या माध्यम ातून छत्रपती संभाजीनगरहून इगतपुरीला पोहोचणे आता अत्यंत सुलभ झाले आहे. यामुळे 'वीकेंड होम' किंवा 'सेकंड होम' शोधणाऱ्यांसाठी इगतपुरी हे पहिले केंद्र बनले आहे. सह्याद्रीच्या कुशीत वसलेले हे हिल स्टेशन वर्षभर आल्हाददायक हवामान आणि धुक्यांच्या चादरीसाठी ओळखले जाते. मुंबई आणि ठाण्याप्रम ाणेच आता संभाजीनगरच्या नागरिकांनाही येथील निसर्गसौंदर्य आणि परवडणाऱ्या घरांच्या किमती भुरळ घालत आहेत.

इगतपुरीतील घोटी परिसरात त्र्यंबकेश्वरच्या सानिध्यात 'होलिस्टिक लिव्हिंग'ची संकल्पना रूजत आहे. रुंगटा ग्रुप आणि युनायटेड बिल्डर्स यांचा संयुक्त प्रकल्प 'अर्थ वन' यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जागतिक ख्यातीचे हेल्थ गुरू डॉ. मिकी मेहता हे या प्रकल्पाचे ब्रँड ॲम्बेसेडर असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली येथे राहणाऱ्या नागरिकांना आरोग्याभिमुख जीवनशैली मिळणार आहे. एकूणच, निसर्गसौंदर्य, धार्मिक स्थळांची जवळीक आणि आधुनिक सोयीसुविधा यामुळे इगतपुरी आता खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे 'हॉट डेस्टिनेशन' ठरत आहे.

या बाबत डॉ. मिकी मेहता म्हणाले की, इगतपुरीची नैसर्गिक ऊर्जा विलक्षण आहे. इथली शुद्ध हवा, मोकळे आकाश आणि निसर्गाशी असलेले जवळचे नाते माणसाला शारीरिक आणि आध्यात्मि कदृष्ट्या पुनरुज्जीवित करते. 'अर्थ वन' प्रकल्प केवळ घरांची निर्मिती नसून, तो निसर्ग आणि आधुनिक जीवनशैलीचा मेळ घालणारा एक 'वेलनेस हब' आहे. जिथे तुम्ही राहता, त्याचा प्रभाव तुमच्या आरोग्यावर होतो आणि इगतपुरी हे आरोग्यदायी जीवनासाठी सर्वोत्तम ठिकाण आहे. याबाबत युनाइटेड ग्रुप चे ललित रुंगटा यांनी सांगितले की, छत्रपती संभाजीनगर आणि जालना पट्ट्यातील नागरिक निसर्गाच्या सानिध्यात घर शोधत आहेत. इगतपुरीतील हा प्रकल्प आम्ही त्यांच्या गरजा लक्षात घेऊनच साकारला आहे. येथे केवळ जमीन किंवा घर न मिळता, एक संपूर्ण 'कम्युनिटी लिव्हिंग'चा अनुभव मिळणार आहे. समृद्धी महामार्गामुळे इगतपुरीची कनेक्टिव्हिटी ही सर्वात मोठी जमेची बाजू ठरली आहे.




### जालन्यात भाजपच्या निषेध आंदोलनाला काँग्रेसकडून जोरदार प्रतिआव्हान

# खासदार कार्यालयासमोर घोषणाबाजी; दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते आमने-सामने






**जालना । प्रतिनिधी -** हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यावरून जालन्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. जालन्याचे काँग्रेस खासदार कल्याण काळे यांच्या कार्यालयासमोर भाजप कार्यकर्त्यांनी तीव्र निषेध आंदोलन करत सपकाळ यांच्या पोस्टरला जोडे मारून संताप व्यक्त केला.

भाजपाच्या वतीने हे आंदोलन पक्षाचे आदेश आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आल्याचे सांगण्यात आले. सपकाळ यांनी शिवाजी महाराजांशी टिपू सुलतान यांची तुलना केल्याचा आरोप करत राज्यभर आंदोलन छेडण्यात आले आहे.

दरम्यान, काँग्रेस पक्षानेही या आंदोलनाचा जाहीर निषेध नोंदवला आहे. काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, सपकाळ यांनी केलेले वक्तव्य हे ऐतिहासिक संदर्भावर आधारित असून त्याचा विपर्यास करून भाजप राजकीय फायदा मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. टिपू सुलतान यांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या आदर्शातून प्रेरणा घेत ब्रिटिशांविरोधात लढा दिला. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांचे योगदान होते, हे ऐतिहासिक सत्य आहे, असे काँग्रेसने म्हटले आहे.

काँग्रेसने भाजपावर दुहेरी भूमिका घेतल्याचा आरोप करत काही उदाहरणेही पुढे केली. कर्नाटकात २०१२-१३ दरम्यान भाजपाचे सरकार असताना तत्कालीन मुख्यमंत्री जगदीश शेट्टर यांनी टिपू सुलतान यांच्या कार्याचा गौरव करणारे पत्र लिहिले होते, असा दावा काँग्रेसने केला. तसेच माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा यांनी टिपू सुलतान यांच्या कबरीला भेट दिल्याची आठवण करून देत, त्यावेळी भाजपाने निषेध केला नव्हता, मग आज का? असा सवाल उपस्थित करण्यात आला.

काँग्रेसने आणखी आरोप केला की, कर्नाटकात भाजप सरकार असताना टिपू सुलतान जयंती साजरी करण्यात आली होती. मुंबईत काही रस्त्यांना टिपू सुलतान यांचे नाव देण्यात आले असून त्यासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) देखील भाजप सरकारच्या काळातच काढण्यात आला होता, असा दावा करण्यात आला.

आम्ही ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाबद्दल बोललो तर भाजपाच्या भावना दुखावतात; पण स्वतःच्या काळातील निर्णयांवर मात्र ते मौन बाळगतात. ही दुटप्पी भूमिका जनतेसमोर उघडी पडली आहे, अशी टीका काँग्रेसकडून करण्यात आली.

या सर्व घडामोडींमुळे जालन्यात काँग्रेस-भाजप संघर्ष अधिक तीव्र झाला असून, आगामी काळात या वादाचे पडसाद राज्याच्या राजकारणात उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यावेळी जालना काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष कृष्णा पडुळ. काँग्रेस सेवादल अध्यक्ष शेख इब्राहिम. माजी नगरसेवक वाजेद खान, युवक अध्यक्ष वसीम शेख. शेतकरी वाढेकर. राम कुराढे. आसिफ पठाण. अमोल भोसले. शामशोदिन. संजय देठे. दीपक भाऊ. विशाल धनुरे. बाबासाहेब सोनवणे सोनवणे सह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# उदयसिंह बोराडे यांच्या हस्ते केहाळ वडगाव येथे शिवसेना शाखेचे उदघाटन

### गाव तिथे शाखा उपक्रमाला वेग

**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील केहाळ वडगाव येथे दि. १२ फेब्रुवारी रोजी शिवसेना पक्षाच्या नव्या शाखेचे भव्य उद्घाटन मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडले. गाव तिथे शाखा या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात तालुक्यातील कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. शाखेचे उद्घाटन मंठा तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग, तरुण कार्यकर्ते तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाखेच्या उद्घाटनानंतर परिसरात फटाक्यांची आतषबाजी आणि घोषणांनी वातावरण दणाणून गेले.

उद्घाटन प्रसंगी बोलताना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे म्हणाले की शिवसेना ही केवळ राजकीय संघटना नसून ती सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी लढणारी चळवळ आहे. 'गाव तिथे शाखा' हा उपक्रम म्हणजे गावागावात शिवसेनेची ताकद वाढवण्याचा निर्धार आहे. केहाळ वडगाव ही शाखा स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठी प्रभावी व्यासपीठ ठरेल. शेतकरी, तरुण, महिला आणि वंचित घटकांच्या न्यायासाठी शिवसेना सदैव कटिबद्ध राहील, असे ते म्हणाले.तसेच पुढे त्यांनी कार्यकर्त्यांना उद्देशून सांगितले की,

संघटन मजबूत असेल तरच विकासाला गती मिळते. प्रत्येक शिवसैनिकाने गावाच्या प्रगतीसाठी आणि जनतेच्या विश्वासासाठी प्रामाणिकपणे काम करावे.

त्यांच्या भाषणास उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमास उपतालुकाप्रमुख रामराव वरकड, उपतालुकाप्रमुख अक्षयदीप वाघमारे, युवासेना तालुकाप्रमुख दीपक गायकवाड, दलित आघाडी तालुका प्रमुख दिलीपराव हिवाळे, युवासेना उपतालुकाप्रमुख विजय चव्हाण, युवासेना शहरप्रमुख ड. राजेश खरात, शिवसेना उपशहरप्रमुख बंडू नाना बोराडे, शिवसैनिक भगवानराव गायकवाड, पप्पू बोराडे तसेच नवनियुक्त शाखा पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.पदाधिकाऱ्यांनी आपल्या मनोगतातून संघटन बळकटी, गावातील मूलभूत सुविधा, युवकांना संधी आणि सामाजिक एकात्मता यावर भर देत काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

नवीन शाखेमुळे केहाळ वडगाव परिसरातील स्थानिक प्रश्नांना अधिक प्रभावीपणे वाचा फोडली जाणार असून संघटनात्मक कामाला गती मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. गावातील पाणी, रस्ते, वीज, शिक्षण आणि रोजगार या विषयांवर सक्रिय भूमिका घेण्याचा निर्धार शिवसैनिकांनी केला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानण्यात आले आणि शाखा परिसरात एकोप्याचा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## संदीप बिभीषण कांबळे यांचे दु:खद निधन



**जालना -** नुतन वसाहात येथील संदीप बिभीशन कांबळे (वय ४६) यांचे अल्पशा आजाराने रविवारी पहाटे ४ वाजता दु:खत निधन झाले. त्यांच्यावर जेईएस कॉलेजच्या पाठीमागे ख्रिश्चन स्मशानभुमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व. संदीप कांबळे हे उत्कृष्ट तबला वादक होते. ते अत्यंत प्रेमळ, मनमिळावू व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, आई, वडील, दोन भाऊ, एक बहीण असा मोठा परिवार आहे.

# मालमत्तेच्या हस्तांतरणानंतरही, पोटगी हक्क कायम मालमत्ता व्यवहारात अधिक सतर्कतेची गरज - ॲड. महेश धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** एका दूरगामी आणि महत्त्वपूर्ण निकालात, केरळ उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाने असे म्हटले आहे की, पतीच्या मालमत्तेच्या हस्तांतरणानंतरही, त्या मालमत्तेतून मिळणाऱ्या उत्पन्नातून पोटगी मिळविण्याचा हिंदू पत्नीला पूर्ण अधिकार आहे. हा अधिकार तेव्हा लागू होतो, जेव्हा पोटगीसाठी कायदेशीर कार्यवाही सुरू झाल्यानंतर मालमत्तेचे हस्तांतरण झाले असेल किंवा हस्तांतरणाच्या वेळी खरेदीदाराला पत्नीच्या दाव्याची माहिती असल्याचे पुरावे असतील. या निकालामुळे पोटगीच्या हक्कांसाठी लढणाऱ्या महिलांना मोठे कायदेशीर बळ मिळाले असून मालमत्ता खरेदी-विक्री व्यवहारात अधिक पारदर्शकता आणि दक्षता बाळगण्याची गरज निर्माण झाली आहे.

न्यायमूर्ती सुश्रुत अरविंद धर्माधिकारी, न्यायमूर्ती पी.व्ही. कुन्हीकृष्णन आणि न्यायमूर्ती जी. गिरीश यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, अशा प्रकरणांमध्ये पत्नीच्या पोटगीच्या हक्काला मालमत्ता हस्तांतरण कायदा, १८८२ चे कलम ३९ आणि हिंदू दत्तक आणि देखभाल कायदा, १९५६ चे कलम २८ अंतर्गत संरक्षण मिळेल. या कलमांनुसार, एखाद्या अचल मालमत्तेच्या हस्तांतरणानंतरही, तिसऱ्या व्यक्तीच्या पोटगीच्या हक्काचे संरक्षण होते. न्यायालयाने नमूद केले की, विवाहाच्या वेळी पत्नीचा हा हक्क सुप्त अवस्थेत असतो, जेव्हा ती पोटगीसाठी कायदेशीर कार्यवाही सुरू करते तेव्हा तो एक अपूर्ण हक्क बनतो आणि जेव्हा सक्षम न्यायालय तिला पतीकडून पोटगी मिळण्याचा हक्क आहे असे घोषित करते, तेव्हा तो मालमत्तेवर एक भार म्हणून प्रस्थापित होतो.

या प्रकरणात एका याचिकाकर्त्याने पतीकडून मालमत्ता खरेदी केली होती, ज्यावर नंतर कौटुंबिक न्यायालयाने पत्नीच्या पोटगीच्या दाव्यासाठी जप्ती आणली होती. खरेदीदाराने असा दावा केला की तो एक प्रामाणिक खरेदीदार आहे आणि पत्नीचा मालमत्तेवर कोणताही हक्क नाही. तथापि, कौटुंबिक न्यायालयाने मालमत्ता हस्तांतरण कायद्याच्या कलम ३९ चा आधार घेत पत्नीचा हक्क मान्य केला. या निर्णयाविरुद्ध अपील दाखल झाल्यानंतर, विविध निकालांमधील विरोधाभास लक्षात घेता, हे प्रकरण उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाकडे पाठविण्यात आले होते. पूर्णपीठाने कायद्याचे विश्लेषण करून हा महत्त्वाचा निकाल दिला, ज्यामुळे या विषयावरील कायदेशीर संभ्रम दूर झाला आहे.

या निकालावर भाष्य करताना, नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, ॲड. महेश धनावत यांनी सांगितले की, केरळ उच्च न्यायालयाचा हा निर्णय खरोखरच ऐतिहासिक आहे आणि देशभरातील पोटगीच्या प्रकरणांवर याचा सकारात्मक परिणाम होईल. या निर्णयाने हिंदू पत्नीच्या पोटगीच्या हक्काला एक नवीन आणि मजबूत कायदेशीर आधार दिला आहे. अनेकदा, पत्नीला पोटगी देण्याचे टाळण्यासाठी पती आपली मालमत्ता घाईघाईने विकून टाकत असे, ज्यामुळे पत्नीला तिच्या हक्कांपासून वंचित राहावे लागत होते. आता या निर्णयामुळे अशा प्रकारांना आळा बसेल.

ॲड. धनावत पुढे म्हणाले, या निकालामुळे मालमत्ता खरेदी करणाऱ्यांनी देखील अधिक सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. कोणतीही मालमत्ता खरेदी करण्यापूर्वी, विक्रेत्याची कौटुंबिक पार्श्वभूमी, विशेषतः वैवाहिक वाद किंवा पोटगीच्या दाव्यांविषयीची माहिती घेणे महत्त्वाचे ठरेल. जर कायदेशीर कार्यवाही सुरू असताना मालमत्ता हस्तांतरित झाली, तर खरेदीदाराला पत्नीच्या दाव्याची माहिती होती असे गृहीत धरले जाईल. त्यामुळे, हा निकाल केवळ महिलांच्या हक्कांचे संरक्षण करत नाही, तर मालमत्ता व्यवहारात अधिक जबाबदारी आणि पारदर्शकता आणण्यासही मदत करेल. हा खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचा कायदेशीर टप्पा आहे.

उच्च न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले की, जेव्हा पत्नी कायदेशीर नोटीस पाठवते किंवा पोटगीसाठी न्यायालयात अर्ज दाखल करते, त्या क्षणापासून तिचा हक्क मालमत्तेवर प्रस्थापित होतो. जर या कालावधीत मालमत्ता विकली गेली, तर खरेदीदाराला या हक्काची माहिती होती असे मानले जाईल. न्यायालयाने 'विजयन विरुद्ध शोभना' (२००७) प्रकरणातील पूर्वीचा निकाल चुकीचा ठरवत, हिंदू पत्नीचा पोटगीचा हक्क केवळ पतीपुरता मर्यादित नसून त्याच्या मालमत्तेपर्यंतही विस्तारित आहे, यावर शिक्कामोर्तब केले. या निर्णयामुळे देशभरातील कौटुंबिक न्यायालयांना पोटगीच्या दाव्यांवर निर्णय देताना एक स्पष्ट दिशा मिळाली आहे.


### शिवछत्रपती राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार मावळा - द बोर्ड गेम चे संचालक श्री अनिरुद्ध राजदेरकर यांना जाहीर

# गुणवत्ता वाढीसाठी काम करणाऱ्या ५१ शिक्षकांचा गुरुगौरव आदर्श शिक्षक पुरस्कार रुपाने सन्मान करणार - प्रा.सहदेव मोरे पाटील

### शिवजन्मोत्सव साजरा करण्याचे मोरे पाटील परिवाराचे सलग १९ वे तर पुरस्काराचे ७ वे वर्ष; माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण

**जालना । प्रतिनिधी -** मोरे पाटील परिवार व शिवसृष्टी च्या वतीने देण्यात येणारा शिवछत्रपती राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार - २०२६ जाहीर करण्यात आला असून मावळा द बोर्ड गेम चे संचालक श्री अनिरुद्ध राजदेरकर यांना यावर्षी सन्मानित केले जाणार आहे. मावळा द बोर्ड गेम हा एक आगळावेगळा स्वरूपाचा खेळरूपी उपक्रम असून खेळाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचा ज्ञात आणि अज्ञात इतिहास, शिवाजी महाराजांचे शौर्य नीति स्वराज्याची भावना आणि राष्ट्रप्रेम अत्यंत प्रभावीपणे समजण्यास मदत होते त्याचबरोबर आजच्या डिजिटल आणि मोबाईलच्या युगात काल्पनिक सुपरहिरोंच्या जगात अडकलेल्या मुलांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या दैदीप्यमान इतिहासाची ओळख व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न केला जात आहे, मावळा हे त्याचेच प्रतीक आहे अशी माहिती शिवजन्मोत्सवाचे आयोजक प्रा. सहदेव मोरे पाटील व डॉ. कल्याण मोरे पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.





मागील १८ वर्षापासून कौटुंबिक स्वरूपात कुठल्याही प्रकारची वर्गणी जमा न करता स्वखर्चाने मोरे पाटील परिवाराच्या वतीने शिवजन्मोत्सव कार्यक्रम मंठा शहरांमध्ये साजरा केला जातो. शिवजन्मोत्सव साजरा करताना सलग १२ वर्षे अर्थात एक तप पूर्ण झाल्यानंतर त्यात वाढ करावी म्हणून शिवछत्रपती राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्काराच्या रूपाने विविध क्षेत्रातील मान्यवर ज्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा वसा आणि वारसा जपण्याचा आणि पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे अशा महानुभावांना सन्मानित केले जाते. माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते व भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे

यापूर्वी २०२० - बाळू महाराज गिरगावकर, २०२१ - शिवरायांचे सहकारी कान्हजी जेधे यांचे वंशज राजधिर जी जेधे, २०२२ - तत्कालीन मुख्यमंत्री आरोग्य सहाय्यता कक्षाचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे, २०२३ - शिवरायांचे सहकारी शिवरत्न शिवा काशिद यांची वंशज आनंदराव काशीद, २०२४ - नरवीर तानाजी मालुसरे यांच्या वंशजा डॉ. शितलताई मालुसरे तर मागील वर्षी अर्थात २०२५ - दुर्गनिर्माते हिरोजी इंदलकर यांचे वंशज संतोष इंदलकर यांना सन्मानित करण्यात आले आहे.

खेळाच्या माध्यमातून इतिहास सांगणे ही कल्पना जितकी सुंदर आहे तितकीच ती परिणामकारकही आहे कारण खेळताना मुलं शिकतात समजून घेतात आणि नकळत संस्कार आत्मसात करतात मावळा या उपक्रमाच्या माध्यमातून केवळ प्रसिद्धीस आलेला इतिहासच नव्हे तर आतापर्यंत अज्ञात असलेला फारसा उजेडात न आलेला किंवा दुर्लक्षित राहिलेला इतिहास देखील मुलांच्या मनावर कोरला जाणार आहे छत्रपती शिवाजी महाराजांची मावळे त्यांची धैर्य त्या रणनीती स्वराज्याची उभारणी हे सगळं अत्यंत खेळीमेळीच्या रोचक आणि मुलांना आवडेल अशा पद्धतीने मावळा या खेळाच्या माध्यमातून सादर केले जाते व मुलांना खरा इतिहास समजू लागतो त्याची आवड निर्माण होते असेही यावेळी संयोजकांच्या वतीने देण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

आपल्या संस्कृतीची, आपल्या इतिहासाची आणि आपल्या अस्मितेची केवळ माहिती मिळवण्याची नव्हे तर त्याची ओळख निर्माण करण्याची गरज आहे. मावळा हा उपक्रम मुलांवर शिवछत्रपतींचे संस्कार घडवण्याचे अत्यंत प्रभावीपणे काम करते शिवरायांचे विचार मुलांच्या मनात बिंबवले गेले तर भविष्यात एक सशक्त स्वाभिमानी आणि जबाबदार पिढी घडेल. त्यामुळे मावळा करत असलेले हे खेळरूपी कार्य म्हणजे इतिहास जपण्याबरोबरच मुलांचे भविष्य घडवण्याचे काम करत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा इतिहास त्यांच्या विचारांचा वारसा आणि मावळ्यांची शौर्यगाथा लहान मुलांपर्यंत पोहोचवण्याचे हे महान कार्य असेच अविरत सुरू राहावे यासाठी शाबासकीची थाप म्हणून यावर्षीचा शिवछत्रपती राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार मावळाला दिला जात असल्याची माहिती देखील आयोजकांनी प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रभक्तीची भावना वृद्धिंगत करणारा ठरणार आहे. या सोहळ्यात शिवचरित्रावर आधारित विविध उपक्रम, अभिवादन व मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून शिवरायांच्या विचारांचा समाजात प्रसार करण्याचा मुख्य उद्देश आहे.





या शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरातून गरजू रुग्णांना मदत होणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. तसेच उपस्थित सर्व नागरिकांसाठी स्नेहभोजनाचेही आयोजन करण्यात आले आहे. मोरे पाटील परिवार व शिवसृष्टीच्या वतीने राबविण्यात येणारा हा उपक्रम समाजात एकोप्याची भावना वाढविणारा असून शिवरायांच्या प्रेरणादायी विचारांना उजाळा देणारा ठरणार आहे. या कार्यक्रमाला सर्व शिवभक्तांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उत्सवात सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रा. सहदेव मोरे पाटील व डॉ. कल्याण मोरे पाटील यांनी केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.